# प्रेस नोट

दिनांक १६/०२/२०२२

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. अशोक शेळके, वय. ५८ वर्षे, मुळ पद पुरवठा निरीक्षण अधिकारी, अतिरीक्त पदभार निवासी नायब तहसीलदार राजापुर (वर्ग-२), तहसीलदार कार्यालय राजापुर सध्या रा. बंगलवाडी ता. राजापुर जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | तहसीलदार कार्यालय राजापुर येथील आवारात |
| तक्रार अर्जातील लाचेची रक्कम | १५,०००/-रुपये |
| मागितलेली लाचेची रक्कम | १०,०००/- ते १५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | स्विकारलेली लाचेची रक्कम १०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे कसत असलेली जमिनीमध्ये त्यांचे कुळ लागण्यासाठी त्यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे तहसीलदार राजापुर यांचेकडे ७० ब अंतर्गत दावा दाखल केलेला होता. सदर दाव्याचा निकाल त्यांचे पत्नीच्या बाजुने लावुन तशी ऑर्डर देण्याकरीता लोकसेवक श्री. अशोक शेळके, पुरवठा निरीक्षण अधिकारी, अतिरीक्त पदभार निवासी नायब तहसीलदार राजापुर यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. अशोक शेळके यांचेविरुध्द अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी येथे दिनांक ०४/०२/२०२२ रोजी लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी व दिनांक ०९/०२/२०२२ रोजी केलेल्या सापळा कारवाई मध्ये लोकसेवक श्री. अशोक शेळके यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पत्नीच्या नावे ७० ब अंतर्गत दाखल केलेल्या दाव्याचा निकाल त्यांचे बाजुने लावुन तशी ऑर्डर देण्याकरीता १०,०००/- ते १५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे पत्नीच्या नावे दाखल केलेल्या ७० ब च्या दाव्याचा निकाल तक्रारदार यांचे पत्नीच्या बाजुने लावुन तशी ऑर्डर देण्याकरीता लोकसेवक श्री. अशोक शेळके यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी तडजोडीअंती १०,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन दिनांक १६/०२/२०२२ रोजी १७.१० वाजता राजापुर तहसीलदार कार्यालयाचे आवारात पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना तहसीलदार राजापुर यांचे दालनातुन पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

16/02/2022

**प्रविण आ.ताटे**
**पोलीस निरीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.**